**वाचले :-**

१. नियुक्ती आदेश क्रमांक साप्रवि/१/कावि/९९०/२०२१, दि.२७/०९/२०२१
२. कार्यालयीन अधिक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे ०१ यांचेकडून दि.१०/०७/२०२३ अन्वये प्राप्त झालेले अनुकुल वैद्यकीय तपासणी अहवाल
३. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकडील पत्र क्र.वायसीएमएच/१/कावि/४४६/२०२४, दि.०६/०३/२०२४ अन्वये प्राप्त झालेला कामकाज अहवाल
४. अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/७९५/१७, दि.०१/११/२०१७
५. आदेश क्र.प्रशा/२/कावि/७४/२०२१ दिनांक २८/०१/२०२१
६. सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०६/१२/२०२४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/१५८/२०२४
दिनांक ०६ /१२/२०२४

**विषय** :- "ऑन्को सर्जन" पदावरील नियुक्तीचा परिविक्षाधिन कालावधी वाढविणेबाबत...

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वैद्यकीय विभगाचे आस्थापनेवर जाहिरात क्र. ७३/२०१९ अन्वये "ऑन्को सर्जन" या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार ऑन्को सर्जन पदावर र.रु १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमतः ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये आदेश निर्गत करणेत आला होता. तथापि परिविक्षाधिन कालावधी जरी ०२ वर्षाचा असला तरी जोपर्यंत त्यांची नियुक्ती नियमित केली जाणार नाही तो पर्यंत त्यांची नियुक्ती ही परिविक्षाधिनच राहील असे नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करणेत आले आहे.

डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद, ऑन्को सर्जन यांचा नियुक्तीचा प्रवर्ग,रुजू दिनांक व परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात आलेला दिनांक यांचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | प्रवर्ग | महापालिका रुजू दिनांक | परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आलेला दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद | खुला | १२/१०/२०२१ | ११/१०/२०२३ |

डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद, ऑन्को सर्जन यांनी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार MS-CIT ची अर्हता धारण केल्याचे प्रमाणपत्राची प्रत तसेच त्यांचा अनुकुल वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे.

अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांनी उपरोक्त वाचले क्र.०३ चे पत्रान्वये डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद, ऑन्को सर्जन यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झालेला असल्याने त्यांचे कार्यक्षमतेमध्ये सुधारणा होणेकरीता ०१ वर्षाचा परिविक्षाधिन कालावधीची वाढ करणेकामी स्वंयस्पष्ट शिफारस केली आहे.

सबब विभागप्रमुखांनी केलेल्या स्वंयस्पष्ट शिफारस विचारात घेता डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद यांना ऑन्को सर्जन या पदावर देण्यात आलेली मूळ नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहून नियुक्ती आदेशात नमूद केलेला परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात आल्याचे दुस-या दिनांकापासून पुढे ०१ वर्ष कालावधीकरीता परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यास सदर आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित अधिका-यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

E/prashasan/2024/pgi niymit/pro

प्रति,

डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद, ऑन्को सर्जन

प्रत- १.लेखा विभाग २.लेखापरिक्षण विभाग ३. साप्रवि टेबल क्र.७,९,१०,१२,१४, संगणक कक्ष

४.सर्व संबंधित विभाग -

५. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

२/- वरील अधिकारी यांचा वाढीव परिविक्षाधिन कालावधीमधील हजेरी, वर्तणूक व कामकाजाचा अहवाल परिविक्षाधिन कालावधी संपणेपूर्वी १५ दिवस अगोदर विहीत नमुन्यात सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८